# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०१/२०२६ (बुधवार )**

## नायलॉन मांजा वर प्रतिबंध करणे कामी नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी ३६ आरोपीतांना केले स्थानबध्द

आज दिनांक १४/०१/२०२६ रोजी मकर संक्रांती सणाच्या पार्श्वभूमीवर **नायलॉन मांजावर प्रतिबंध** करणेकामी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण पोलीसांनी नुकत्याच दाखल झालेल्या नायलॉन मांजा प्रकरणातील नायलॉन मांजा वापरून पतंग उडविणारे आणि विक्री करणारे **३६ आरोपींना** आज सुर्यास्तापर्यंत स्थानबद्ध करण्यात आले. सर्व ठाणे प्रभारी अधिकारी आपआपल्या हददीत सर्तक पेट्रोलींग करून नायलॉन मांजा वापरकर्ते आणि विक्रेते यांचे वर लक्ष ठेवुन आहे. नायलॉन मांजा कायद्याने पूर्णपणे बंद असून, उल्लंघन करणाऱ्यांवर खलील प्रमाणे कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

कोणतीही व्यक्ती नायलॉन मांजासह पतंग उडवताना आढळल्यास २५,०००/— दंड ,कोणताही विक्रेता नायलॉन मांजाचा साठा बाळगताना आढळल्यास, त्यास रुपये २,५०,०००/— इतका दंड तसेच अल्पवयीन बालाकांनी उल्लंघन केल्यास त्यांच्या पालकांकडून दंड वसूल करण्यात येईल, हा दंड प्रत्येक उल्लंघनासाठी लागू राहील.

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ३ लाख ८७ हजारांचा मुद्देमाल जप्त रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक १३/०१/२०२६ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, नगरधन रामटेक येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता **आरोपी नामे १) राहुल नागोराव चौरे, वय २६ वर्ष, रा.वलनी सावनेर २) रितीक सिदार्थ बागडे, वय २४ वर्ष, रा. नगरधन, ता. रामटेक ३) प्रदिप मानिक मारवाडे, वय ३० वर्ष, रा. नगरधन ४) निकेश मोरेश्वर मलेवार, वय २५ वर्ष, रा. नगरधन ५) सचिन सुलके, रा. नगरधन ६) रवि मानेश्वर, रा. नगरधन ७) यश कामडी, रा. नगरधन ८) आशिष कावडे, रा. नगरधन ९) निखिल शाहुसाखळे रा. नगरधन** हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना जागीच मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन १) ५२ तासपत्ते २) चार दुचाकी वाहन किंमती ३,५०,०००/—रूपये ३) एक अँन्ड्राईड मोबाईल किंमती ३७,०००/— रूपये ४) नगदी ६५०/—रूपये असा **एकुण ३,८७,६५०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे**. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन रामटेक येथे १२ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०४ गुन्हे नोंद

दिनांक १३/०१/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू असा एकुण ८५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत आरोपी रोशन राजू चिटटवार, वय ३६ वर्ष, रा. बसवार लेआउट सावनेर याचेवर गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत आरोपी प्रमोद अन्नाजी मुंदाफळे, वय ३७ वर्षे, रा.मालापुर, ता. नरखेड याचेवर १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवनी येथे आरोपी ज्ञानेश्वर रामदास करनाके, वय ३५ वर्षे, रा. करंभाड वार्ड नं. ३, तह पारशिवनी याचेवर १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे आरोपी शंकर कवडुजी पारसे, वय ३३ वर्ष, रा. वार्ड क्र ४, बुटीबोरी, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. अशा एकुण ०४ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ४ गुन्हे दाखल केले आहे.

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन काटोल :—** दिनांक १३/०१/२०२६ रोजी काटोल पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता सरस्वती नगर, काटोल बाजार गल्ली, काटोल परिसरात **आरोपी नामे शेख अजमेर शेख जमिल, वय १९ वर्ष, रा. मंदनीपुर, ता. मनिहारी, जि. कोठीया, राज्य बिहार** हा सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी रात्रीच्या वेळी स्वत:चे अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने नमुद आरोपीचे विरूध्द कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने